**राज्यातील अल्पसंख्याक उमेदवारांकरिता**
**<u>रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
अल्पसंख्याक विकास विभाग
**शासन निर्णय, क्रमांकःअविवि-२००९/प्र.क्र.४१/०९/का.१७**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४ जानेवारी, २०१०

संदर्भ :- १) शासन निर्णय, क्रमांकःअविवि-२००९/प्र.क्र.४१/०९/का.१,दि. ५.२.२००९.
२) पुरक पत्रक क्रमांकःबीयुडी-२००८/प्र.क्र.१५६/०८/का.१, दि.२७.२.२००९.
३) शासन निर्णय, क्रमांकःअविवि-२००९/प्र.क्र.४१/०९/का.१,दि. १८.३.२००९.

**<u>शासन निर्णय</u>** :-

संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील अल्पसंख्याक उमेदवारांकरिता सन २००८-०९ या वर्षासाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबत आला होता. सदर कार्यक्रम सन २००९-१० या वर्षात देखिल राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने अल्पसंख्याक समाजातील बेरोजगार युवक / युवतीसाठी पुढीलप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम कार्यान्वित करण्यास शासन मंजूरी देत आहे.

**I) <u>निरंतर प्रशिक्षण योजना / तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ / मुक्त विद्यापीठ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण योजना</u> :-**

**अ)** **<u>योजनेची व्याप्ती</u>** :- तंत्र निकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये यांमधून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या मान्यतेने निरंतर प्रशिक्षण योजनेंतर्गत राबविण्यात येणारे विविध अभ्यासक्रम (प्रपत्र - क मध्ये विहित केल्याप्रमाणे) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या मान्यतेने चालविण्यात येणारे विविध अभ्यासक्रम व मुक्त विद्यापीठ मान्यताप्राप्त विविध अभ्यासक्रम यामध्ये सन २००९-१० या वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या सुमारे ५००० निवडक अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल.

**ब)** **<u>योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती</u>** :- ही योजना संचालक (तंत्र शिक्षण), तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत राबविली जाईल. उपरोल्लखित अभ्यासक्रमामध्ये तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती म्हणून प्रति विद्यार्थी प्रशिक्षण शुल्काची प्रत्यक्ष रक्कम किंवा रु.४०००/- यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम अदा करण्यात येईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड संचालक,(तंत्र

शिक्षण) यांच्याकडून केली जाईल. संचालक (तंत्र शिक्षण) यांनी निवड केलेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्काच्या प्रतिपूर्तीपोटी द्यावी लागणारी संपूर्ण रक्कम संचालक,(तंत्र शिक्षण), यांच्या अधिनस्त ठेवण्यात येईल. या योजनेतंर्गत दि. ३१ मार्च २०१० पर्यंत प्रशिक्षण दिलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची यादी या शासन निर्णयाअन्वये विहित केलेल्या प्रपत्र "अ" मध्ये अल्पसंख्यांक विकास विभागाकडे दि.५ एप्रिल, २०१० पर्यंत पाठविणे संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावर बंधनकारक राहील.

क) **योजनेच्या अटी व शर्ती :-**

१) प्रपत्र - क मध्ये नमूद केलेल्या अभ्यासक्रमांमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शीख व पारशी ) या योजनेचा लाभ देण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड त्यांनी शालांत परीक्षेमध्ये अर्जित केलेले गुणांनुसार गुणवत्तेवर आधारित राहील.

२) प्रपत्र - क मध्ये नमूद केलेल्या अभ्यासक्रमांमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या संचालक, तंत्र शिक्षण यांनी निवडलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे शुल्क किंवा रु.४,०००/- या पैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती म्हणून देण्यात येईल.

३) या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे. यासंदर्भात स्वयंरोजगार असलेल्या पालकांच्या उत्पन्नांचे प्रतिज्ञापत्र हे स्व-प्रमाणपत्र स्वरुपाचे नॉन ज्युडिशियल स्टॅम्प पेपरवर सादर करणे आवश्यक राहील. नोकरी करणाऱ्या पालकांच्याबाबतीत त्यांच्या नियोक्त्यांकडून प्राप्त केलेला उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.

४) या योजनेत ३० टक्के जागा मुलींसाठी राखून ठेवण्यात येतील.

५) एखाद्या अल्पसंख्याक समाजातील मुलींची संख्या लाभार्थीमध्ये कमी असल्यास त्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी त्या जागा समायोजित कराव्यात.

६) विद्यार्थ्यांकडून या योजनेच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास त्याला या योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ स्थगित करण्यात येईल अथवा संपुष्टात आणण्यात येईल. या योजनेच्या अटींचा भंग झाला असल्याची शासनाची खात्री पटल्यास संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अध्ययन शुल्काची प्रतिपूर्ती रद्द करण्यात येईल.

७) जर एखाद्या विद्यार्थ्यास चुकीच्या माहितीच्या आधारे या योजनेचा लाभ दिला गेल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्यांची अध्ययन शुल्काची प्रतिपूर्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यास प्रदान करण्यात आलेल्या अध्ययन शुल्काच्या प्रतिपूर्तीच्या रक्कमेची वसूली करण्यात येईल.

ड) **योजनेंतर्गत पात्र उमेदवारांची निवड** :- या योजनेचा लाभ देण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड या योजनेंतर्गत विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार संचालक (तंत्र शिक्षण), तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून केली जाईल.

इ) **योजनेची प्रसिध्दी** :- या योजनेची जाहिरात व प्रसिध्दी "अल्पसंख्यांकांच्या समस्यांबाबत संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी" या योजनेमध्ये प्रसिध्दी व इतर बाबींसाठी राखून ठेवलेल्या तरतुदीतून तसेच इतर उपलब्ध निधीतून करण्यात येईल. ही प्रसिध्दी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रातून तसेच अल्पसंख्याक बहूल क्षेत्रातील मोठया खपाच्या वृत्तपत्रातून व अल्पसंख्याक भाषेतील वृत्तपत्रातून करण्यात येईल.

या योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी संचालक (तंत्र शिक्षण), तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहील.

**II) राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून अल्पमुदतीच्या व्यावसायिक प्रशिक्षणाकरिता अनुदान :-**

अ) **योजनेची व्याप्ती** :- राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून अल्पमुदतीचे व्यावसायिक प्रशिक्षण (मॉड्यूलर एम्प्लॉएबल स्कील कोर्सेस उदा. मोटार वाईडिंग, इलेक्ट्रीकल रिपेअर्स, इ.) घेणाऱ्या निवडक ५००० अल्पसंख्याक उमेदवारांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल.

ब) **योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती** :- ही योजना संचालक (व्यवसाय प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत राबविली जाईल. या अभ्यासक्रमांमध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क अनुदान म्हणून प्रतिविद्यार्थी कमाल रु. १५००/- व प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्रति उमेदवार रु.२०००/- पर्यंत किंमतीचे टूल किटस् उपलब्ध करून देण्यात येईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी या योजनेंतर्गत विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड संचालक, (व्यवसाय प्रशिक्षण), यांच्याकडून केली जाईल. संचालक (व्यवसाय प्रशिक्षण) यांनी निवड केलेल्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रशिक्षण शुल्क अनुदानाची रक्कम व प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना टूल किटस् देण्यासाठी लागणारी रक्कम संचालक, व्यवसाय प्रशिक्षण यांच्या अधिनस्त ठेवली जाईल. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संचालक, व्यवसाय प्रशिक्षण यांच्याकडून त्यांच्याकडे याकरिता उपलब्ध असणाऱ्या निधीमधून टूल किट्स उपलब्ध करुन देण्यात येतील.

क) **योजनेच्या अटी व शर्ती** :-

१) या योजने अंतर्गत विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शिख व पारशी) या योजनेचा लाभ देण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड त्यांनी इयत्ता ५ वी, ८ वी व १० वी च्या परीक्षेमध्ये अर्जित केलेल्या गुणांनुसार गुणवत्तेवर आधारित राहील. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना टूल किटस् देण्यासाठी उमेदवारांची निवड त्यांनी संबंधित अभ्यासक्रमात अर्जित केलेल्या गुणांनुसार गुणवत्तेवर आधारित केली जाईल. यासाठी शाळा सोडल्याच्या दाखल्यावर धर्माची नोंद असणे आवश्यक आहे.

२) या योजने अंतर्गत विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या संचालक, व्यवसाय प्रशिक्षण यांनी निवडलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना कमाल रु.१५००/- प्रति विद्यार्थी एवढी रक्कम प्रशिक्षण शुल्क अनुदान म्हणून देण्यात येईल व प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना रु.२०००/- पर्यंतच्या किंमतीचे टूल किट्स देण्यात येतील.

३) या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे. याकरिता स्वयंरोजगार असलेल्या पालकांच्या उत्पन्नांचे प्रतिज्ञापत्र हे स्व-प्रमाणपत्र स्वरुपाचे नॉन ज्युडिशियल स्टॅम्प पेपरवर सादर करणे आवश्यक राहील. नोकरी करणाऱ्या पालकांच्याबाबतीत त्यांच्या नियोक्त्यांकडून प्राप्त केलेला उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.

४) या योजनेत ३० टक्के जागा मुलींसाठी राखून ठेवण्यात येतील.

५) एखाद्या अल्पसंख्याक समाजातील मुलींची संख्या लाभार्थींमध्ये कमी असल्यास त्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी त्या जागा समायोजित कराव्यात.

६) विद्यार्थ्यांकडून या योजनेच्या कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास त्याला या योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ स्थगित करण्यात येईल अथवा संपुष्टात आणण्यात येईल.

७) जर एखाद्या विद्यार्थ्यांस चुकीच्या माहितीच्या आधारे या योजनेचा लाभ दिला गेल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्यास देण्यात येणारे प्रशिक्षण शुल्क अनुदान तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यास प्रदान करण्यात आलेल्या प्रशिक्षण शुल्क अनुदानाच्या रक्कमेची वसूली करण्यात येईल. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या उमेदवारांच्याबाबतीत योजनेचा लाभ चुकीच्या माहितीच्या आधारे दिला गेल्याचे निदर्शनास आल्यास, अशा उमेदवारांना टूल किटस् खरेदीकरिता लागणाऱ्या रकमेची वसूली करण्यात येईल.

ड) **<u>योजनेंतर्गत पात्र उमेदवारांची निवड</u>** :- या योजनेचा लाभ देण्यासाठी विद्यार्थ्यांची निवड या योजनेंतर्गत विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार संचालक, व्यवसाय प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून केली जाईल. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या निवडक उमेदवारांना संचालक, व्यवसाय प्रशिक्षण यांचेकडून टूल किटस् उपलब्ध करुन देण्यात येतील. या योजनेतंर्गत दि. ३१ मार्च २०१० पर्यंत प्रशिक्षण दिलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची यादी या शासन निर्णयाअन्वये विहित केलेल्या प्रपत्र "ब" मध्ये अल्पसंख्यांक विकास विभागाकडे दि.५ एप्रिल, २०१० पर्यंत पाठविणे संचालक (व्यवसाय प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यावर बंधनकारक राहील.

इ) **<u>योजनेची प्रसिध्दी</u>** :- या योजनेची जाहिरात व प्रसिध्दी "अल्पसंख्याकांच्या समस्यांबाबत संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी" या योजनेमध्ये प्रसिध्दी व इतर बाबींसाठी राखून ठेवलेल्या तरतुदीतून तसेच इतर उपलब्ध निधीतून करण्यात येईल. ही प्रसिध्दी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रातून

तसेच अल्पसंख्याक बहूल क्षेत्रातील मोठया खपाच्या वृत्तपत्रातून व अल्पसंख्याक भाषेतील वृत्तपत्रातून करण्यात येईल.

या योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी संचालक (व्यवसाय प्रशिक्षण), व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहील.

या योजनेसाठी चालू वित्तीय वर्षात रु.१.७५ कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे.

**III) बेरोजगार अल्पसंख्याक उमेदवारांना मॉल्समध्ये नोकरी उपलब्ध होण्याकरिता प्रशिक्षण देणे :-**

**अ)** **<u>योजनेची व्याप्ती</u>** :- राज्यातील शहरी भागातील किमान शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेले अल्पसंख्याक समाजातील (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शीख व पारशी) निवडक ५०० बेरोजगार उमेदवारांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल.

**ब)** **योजनेच्या अंमलबजावणीसाठी नामिकाप्रविष्ट अभिकरणाची (Empanelled Agencies) निवड व त्यांच्या पात्रतेचे निकष** :- ही योजना आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार यांच्यामार्फत नामिकाप्रविष्ट अभिकरणांच्या माध्यमातून राबविली जाईल. राज्यातील बेरोजगार अल्पसंख्याक उमेदवारांना मॉल्समध्ये रोजगाराची संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ६ आठवडयाचे प्रशिक्षण देण्याकरिता आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार, खाजगी क्षेत्रामध्ये सेवा उपलब्ध होण्यासाठी लागणारे आवश्यक प्रशिक्षण देणाऱ्या नोंदणीकृत व मान्यताप्राप्त संस्थांची खालील निकषांच्या आधारे निवड करतील.

१) अभिकरणाकडे पुर्णतः प्रशिक्षित असलेला अध्यापक वर्ग (अर्धवेळ अथवा पुर्णवेळ) असणे आवश्यक आहे.

२) अभिकरणाकडे या स्वरुपाचे प्रशिक्षण केंद्र चालविण्यासाठी आवार व आवश्यक ती साधनसामुग्री असणे आवश्यक आहे.

३) अभिकरणाला अशा प्रशिक्षणाचा किमान १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक राहील.

४) अशी अभिकरणे संबंधित शहरातील मॉल्सशी संबध्द असल्यास त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

५) खाजगी क्षेत्रात रोजगार प्राप्तीसाठी प्रोत्साहित करणाऱ्या व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांकरिता प्रशिक्षण देणाऱ्या अभिकरणांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

**क)** **<u>प्रशिक्षण घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी पात्रतेचे निकष</u>** :-

१) या योजनेचा लाभ देण्यासाठी उमेदवार किमान शालांत परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

२) सदरहू योजनेचा लाभ संबंधित उमेदवाराला केवळ एकदाच दिला जाईल.

३) या योजनेच्या लाभार्थ्यांनी सर्व अध्ययन वर्गास उपस्थित राहणे आवश्यक असून उचित कारणाशिवाय लाभार्थी अनुपस्थित असेल तर सदर उमेदवाराचा खर्च संबंधित अभिकरणांकडून वसूल करण्यात येईल.

४) या योजनेंतर्गत संबंधित अभिकरणास प्रति उमेदवार रु.४०००/- एवढे प्रशिक्षण शुल्क उपलब्ध करून दिले जाईल तर प्रशिक्षणार्थी उमेदवारास रु.४५०/- इतके विद्यावेतन प्रदान करण्यात येईल.

**ड) <u>योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती</u> :-**

१) ही योजना आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार यांच्यामार्फत राबविली जाईल.

२) ही योजना या योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी खाजगी क्षेत्रामध्ये सेवा उपलब्ध होण्यासाठी लागणारे आवश्यक ते प्रशिक्षण देणाऱ्या नोंदणीकृत मान्यताप्राप्त अभिकरणापैकी आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार यांच्याकडून निवड करण्यात आलेल्या अभिकरणांकडून राबविलि जाईल.

३) या शासन निर्णयाद्वारे योजनेच्या अंमलबजावणीसाठी नामिकाप्रविष्ट अभिकरणांच्या निवडीसाठी विहित करण्यात आलेल्या पात्रतेच्या निकषानुसार अभिकरणांची निवड आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार हे करतील.

४) या योजनेसाठी लागणारी संपूर्ण रक्कम (रु.२८,००,०००/-) आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार यांच्या अधिनस्त ठेवण्यात येईल.

५) या योजनेंतर्गत प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या शेवटच्या आठवडयात प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांना, प्रशिक्षण देणाऱ्या अभिकरणांशी जे मॉल्स संबध्द असतील, अशा मॉल्समध्ये प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात येईल.

६) आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षणार्थी उमेदवारांना प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यावेतनाची रक्कम अदा करतील.

७) प्रशिक्षण प्राप्त उमेदवारांपैकी किमान ५०% उमेदवारांना जोपर्यंत मॉल्समध्ये रोजगाराची संधी मिळत नाही, तोपर्यंत आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम संबंधित अभिकरणांना वितरीत करणार नाहीत.

**इ) योजनेची प्रसिध्दी** :- या योजनेची जाहिरात व प्रसिध्दी अल्पसंख्यांक विकास विभागामार्फत आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार हे करतील. ही प्रसिध्दी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रातून तसेच अल्पसंख्याक बहूल क्षेत्रातील मोठया खपाच्या वृत्तपत्रातून व अल्पसंख्याक भाषेतील वृत्तपत्रातून करण्यात येईल.

या योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार यांची राहील.

या योजनेसाठी चालू वित्तीय वर्षात रु.२८,००,०००/- एवढी तरतूद करण्यात आली आहे.

**<u>IV) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षण योजना</u> :-**

**अ) <u>योजनेची व्याप्ती</u>** :- संगणक दुरुस्ती, मोबाईल दुरुस्ती, दूरदर्शन संच दुरुस्ती, प्लंबिंग इ. सारख्या अभ्यासक्रमामध्ये प्रशिक्षण देण्याकरिता राज्यातील किमान शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या निवडक २००० बेरोजगार अल्पसंख्याक उमेदवारांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल.

**ब) योजनेच्या अंमलबजावणीसाठी नामिकाप्रविष्ट अभिकरणाची (Empanelled Agencies) निवड व त्यांच्या पात्रतेचे निकष** :- ही योजना मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत नामिकाप्रविष्ट अभिकरणांच्या माध्यमातून राबविली जाईल. राज्यातील बेरोजगार अल्पसंख्याक उमेदवारांना संगणक दुरुस्ती, मोबाईल दुरुस्ती, दूरदर्शन संच दुरुस्ती, प्लंबिंग इ. सारख्या अभ्यासक्रमाच्या स्वरुपानुसार १ ते ६ महिन्याचे प्रशिक्षण देण्याकरिता रोजगाराभिमुख प्रशिक्षण देणाऱ्या नोंदणीकृत व मान्यताप्राप्त संस्थांची खालील निकषांच्या आधारे मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत निवड करण्यात येईल.

१) अभिकरणाकडे पुर्णतः प्रशिक्षित असलेला अध्यापक वर्ग (अर्धवेळ अथवा पुर्णवेळ) असणे आवश्यक आहे.

२) अभिकरणाकडे या स्वरुपाचे प्रशिक्षण केंद्र चालविण्यासाठी आवार व आवश्यक ती साधनसामुग्री असणे आवश्यक आहे.

३) अभिकरणाला अशा प्रशिक्षणाचा किमान ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक राहील.

४) स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करणाऱ्या व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमांकरिता प्रशिक्षण देणाऱ्या अभिकरणांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

**क) <u>प्रशिक्षण घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी पात्रतेचे निकष</u> :-**

१) या प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेली मूलभूत शैक्षणिक पार्श्वभूमी धारण करणाऱ्या शालांत परीक्षा उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येईल.

२) सदरहू योजनेचा लाभ संबंधित उमेदवाराला केवळ एकदाच दिला जाईल. दारिद्रयरेषेखाली असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

३) या योजनेच्या लाभार्थ्यांनी सर्व अध्ययन वर्गास उपस्थित राहणे आवश्यक असून उमेदवार योग्य त्या कारणाशिवाय अनुपस्थित असेल तर सदर उमेदवाराचा खर्च संबंधित अभिकरणांकडून वसूल करण्यात येईल.

४) या योजनेंतर्गत संबंधित अभिकरणास प्रति उमेदवार रु.६०००/- एवढे प्रशिक्षण शुल्क उपलब्ध करून दिले जाईल.

**ड) <u>योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती</u> :-**

१) ही योजना मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाामार्फत राबविली जाईल.

२) या योजनेंतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण देणाऱ्या नोंदणीकृत व मान्यताप्राप्त अभिकरणांची निवड करण्यासाठी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ यांच्यामार्फत खुली जाहीरात देऊन अर्ज मागविण्यात येतील. या अर्जाची विहित निकषांनुसार छाननी करुन संस्थाची यादी महामंडळ अल्पसंख्याक विकास विभागास पाठविल व अंतिमतः संस्थाची निवड अल्पसंख्याक विकास विभागाकडून करण्यात येईल.

**इ) योजनेची प्रसिध्दी** :- या योजनेची जाहिरात व प्रसिध्दी मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळामार्फत करण्यात येईल. ही प्रसिध्दी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रातून तसेच अल्पसंख्याक बहूल क्षेत्रातील मोठया खपाच्या वृत्तपत्रातून व अल्पसंख्याक भाषेतील वृत्तपत्रातून करण्यात येईल.

या योजनेच्या अंमलबजावणीची पूर्ण जबाबदारी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळ www.maharashtra.gov.in येथे उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१००१०४१३४०११००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( उ.सं. दांडेकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
संचालक, तंत्रशिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक ( व्यवसाय प्रशिक्षण), व्यवसाय व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई,
आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)
निवडनस्ती.

## प्रपत्र - अ

### निरंतर प्रशिक्षण योजना / तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ / मुक्त विद्यापीठ यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण योजना

### दिनांक ३१ मार्च २०१० पर्यंत प्रशिक्षण दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव | विद्यार्थ्याचा धर्म | विद्यार्थ्याचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

## प्रपत्र - ब

### राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून अल्पमुदतीच्या व्यावसायिक प्रशिक्षणाकरिता अनुदान

### दिनांक ३१ मार्च २०१० पर्यंत प्रशिक्षण दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव | विद्यार्थ्याचा धर्म | विद्यार्थ्याचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

## प्रपत्र - क
## अल्प मुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम.

**I) तंत्रशिक्षण**

१. महाराष्ट्र स्टेट सर्टिफिकेट कोर्स इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (MSCIT)
२. सर्टिफिकेट कोर्स इन फौंड्री टेक्नॉलॉजी
३. सर्टिफिकेट कोर्स इन फिलोक्सोग्राफिक प्रिंटींग/ऑफसेट प्रिंटींग/स्क्रीन प्रिंटींग
४. सर्टिफिकेट कोर्स इन एम्बेडेड सिस्टिम
५. सर्टिफिकेट कोर्स इन एनर्जी मॅनेजमेंट अॅन्ड ऑडिट
६. कॉम्प्युटर हार्डवेअर मेन्टेनन्स
७. कॉम्प्यूटर नेटवर्किंग
८. लॅपटॉप मेन्टेनन्स
९. मोबाईल मेन्टेनन्स
१०. फॅक्स / प्रिंटर / कॉम्प्यूटर मेन्टेनन्स
११. प्रोग्रॅमेबल लॉजिक कंट्रोलर (PLC)
१२. पी.सी.बी. डिझाईन
१३. एएसपी नेट प्रोग्रॅमिंग
१४. जावा/अॅडव्हान्स जावा / सी प्रोग्रॅम इ.
१५. कोरल ड्रॉ पेज मेकर / फोटोशॉप इलस्ट्रेटर
१६. अॅनिमेशन / मल्टीमेडीया / वेब डिझाईनिंग
१७. ऑटोकॅड / कॅटीया
१८. एनएक्स-४
१९. मॅटलॅब
२०. बूक बाईंडिंग
२१. अॅडव्हान्स ऑटोमोटीव कोर्स
२२. एअरक्राफ्ट मेन्टेनन्स
२३. फूट वेअर डिझाईन
२४. अल्पमुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम - हॉटेल मॅनेजमेंट अॅन्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी, ट्रॅव्हल अॅन्ड टुरीझम
२५. अल्पमुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम - ड्रेस डिझाईन अॅन्ड फॅशन टेक्नॉलॉजी
२६. शासकीय कला महाविद्यालयातील अल्पमुदतीचे प्रमाणपत्र व्यावसायिक अभ्यासक्रम
२७. राज्य शासनाच्या पदवी व पदविका संस्थांमधील अल्पमुदतीचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम.